# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे 01

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.020/26126939,29707098 फॅक्स 020/26111153

क्र.उशिसं/शिष्य/डीबीटी दि.

ईमेलद्वारा तात्काळ

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :-महाविद्यालय तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणे व नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील योजनांसाठी विद्यार्थ्यांना अर्ज करणेसाठीच्या मुदत वाढीबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, उच्च संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीकरीता विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांची शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावरुन तात्काळ पडताळणी करणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**तथापि दि.०५.११.२०२४ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड अहवालानुसार सन २०२०-२१, सन २०२१-२२ सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५** मधील खालील प्रमाणे विभाग निहाय पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहेत. वर्षनिहाय प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जाचा तपशिल सोबत सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र | विभागाचे नांव | महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | | | विभाग स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | | | दुसऱ्या हप्त्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2020-21 | 2021-22 | 2022-23 | 2023-24 | 2024-25 | 2020-21 | 2021-22 | 2022-23 | 2023-24 | 2024-25 | 2020-21 | 2021-22 | 2022-23 | 2023-24 | 2024-25 |
| 1 | अमरावती | 15 | 46 | 92 | 384 | 1215 | 0 | 1 | 1 | 70 | 1063 | 262 | 254 | 309 | 736 | 0 |
| 2 | छ. संभाजी नगर | 218 | 237 | 597 | 1134 | 7424 | 1 | 10 | 4 | 308 | 2222 | 1260 | 668 | 771 | 1260 | 0 |
| 3 | जळगांव | 73 | 32 | 19 | 53 | 821 | 0 | 6 | 0 | 25 | 412 | 88 | 29 | 98 | 207 | 0 |
| 4 | कोल्हापूर | 27 | 41 | 148 | 272 | 5021 | 0 | 6 | 12 | 172 | 4653 | 470 | 531 | 390 | 2511 | 0 |
| 5 | मुंबई | 45 | 35 | 99 | 120 | 417 | 1 | 0 | 1 | 4 | 59 | 120 | 112 | 85 | 57 | 0 |
| 6 | नागपूर | 13 | 26 | 139 | 398 | 1152 | 0 | 0 | 1 | 7 | 609 | 80 | 74 | 176 | 410 | 0 |
| 7 | नांदेड | 78 | 118 | 302 | 599 | 3200 | 2 | 2 | 1 | 255 | 865 | 659 | 687 | 708 | 1410 | 0 |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | पनवेल | 69 | 103 | 132 | 217 | 1117 | 0 | 0 | 2 | 28 | 112 | 188 | 268 | 338 | 606 | 0 |
| 9 | पुणे | 91 | 116 | 184 | 518 | 7641 | 7 | 0 | 20 | 240 | 4875 | 490 | 454 | 743 | 1967 | 0 |
| 10 | सोलापूर | 9 | 8 | 20 | 10 | 2163 | 0 | 1 | 1 | 0 | 1302 | 75 | 9 | 39 | 2 | 0 |
| | **एकूण** | **638** | **762** | **1732** | **3705** | **30171** | **11** | **26** | **43** | **1109** | **16172** | **3692** | **3086** | **3657** | **9166** | **0** |

महाविद्यालयनी व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पोस्टमॅट्रिक शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालयामार्फत ऑनलाइन पद्धतीने नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर उपलब्ध करण्यात येत आहे.

सदरहू योजनांचे सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षासाठी नवीन व नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक **१५.११.२०२४** रोजीपर्यंत वाढविण्यात आली आहे. महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

NSP पोर्टलवरील डॅशबोर्ड अहवालानुसार सन २०२४-२५ महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या

| Sr.No | Scheme Name | Application Type | Total Received | Final Verified | Defective | Rejected | Pending at Institute | Pending at Dist / State | Total Withdrawn |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Post Matric Scholaship For Students With Disabilities (Quota - 1879) | Fresh | 556 | 295 | 10 | 1 | 123 | 127 | 0 |
| | | Renewal | 379 | 233 | 9 | 0 | 51 | 86 | 22 |
| | | **Total** | **935** | **528** | **19** | **1** | **174** | **213** | **22** |
| 2 | Central Sector Scholarship Scheme (Quota - 7417) | Fresh | 3799 | 1657 | 67 | 17 | 760 | 977 | 0 |
| | | Renewal | 8816 | 5551 | 137 | 11 | 1292 | 1759 | 0 |
| | | **Total** | **12615** | **7208** | **204** | **28** | **2052** | **2736** | **0** |

उक्त महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावरील अर्जांची तत्काळ पडताळणी करून पुढील प्रक्रियेसाठी पाठविण्यात यावेत. जेणेकरून कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी महाविद्यालयांनी आपल्याच्या नोटीस बोर्डावर योजनेबाबत सूचना प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

तसेच, महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवर रोजच्या रोज कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणे

आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय व विभागाच्या स्तरावर विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

तसेच पडताळणी करीता प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या प्रश्नास संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण / विद्यापीठाबाबत कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.

Signed by
Prakash Dhondu Bachhav
Date: 07-11-2024 12:10:48
(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. अप्पर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२.

महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर**

**देवगिरी महाविद्यालया जवळ, रेल्वे स्टेशन रोड (नवीन इमारत), छ.संभाजीनगर ४३१००१**

Website: www.jdheauragngabad Email- schol.jdheaur@gmail.com / dheaur_2007@rediffmail.com

फोन नं ०२४०- २३३१९१३ फॅक्स ०२४०-२३३१९१३

**जा.क्र.सहसं/उशि/औवि/महाडीबीटी/२०२४-२५/** 4778 **दि.:-११/११/२०२४**

**तात्काळ/महत्वाचे**

**प्रति,**

**१. कुलसचिव,**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ,छत्रपती संभाजीनगर.**

**२. प्राचार्य,**

सर्व शासकीय /अशासकीय,अनुदानित / विनाअनुदानित महाविद्यालये
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

**विषय :- महाविद्यालय/ विद्यापीठ स्तरावरील प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती आर्जाची तात्काळ पडताळणी करणे व नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील योजनांसाठी विद्यार्थ्यांना अर्ज करणेसाठीच्या मुदत वाढीबाबत.**

**संदर्भ** :- 1. मा.संचालनालयाचे पत्र क्र.२६४१६४ दिनांक १९.०१.२०२४
२. या कार्यालयाचे पत्र जाक्र. ३३७९/ दि.१२.०८.२०२२-२०२३/दि.१६/१०/२०२४
३. या कार्यालयाचे पत्र जाक्र. ५०५१/ दि.२४.११.२०२३
४. या कार्यालयाचे पत्र जाक्र. ५०६/ दि.२५.०१.२०२४
५. या कार्यालयाचे पत्र जाक्र. ७५७/ दि.१५.०२.२०२४
६. मा.संचालनालयाचे ई.पत्र क्र.३६५५४२ दिनांक ३०.०४.२०२४
७. या कार्यालयाचे पत्र जाक्र. ४२८५/ दि.०७.१०.२०२४
८. . मा.संचालनालयाचे ई.पत्र क्र.----- दिनांक ०७.१०.२०२४
९. मा.संचालनालयाचे ई.पत्र क्र1/665192 दिनांक 7.११.२०२४

**कृपया उपरोक्त संदर्भिय सर्व पत्रांचे अवलोकन व्हावे.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, उच्च शिक्षण संचालनालयाकडून महाडीबीटी पोर्टलवर राबविण्यात येणाऱ्या **नॅशनल स्कॉलरशिप** शिष्यवृत्ती योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी विषयी संदर्भ क्र. १ चे पत्रांन्वये आपणास कळविण्यात आलेले आहे. **परंतू अद्यापपर्यंत बहुतांश महाविद्यालयांनी सन २०२०-२१ ते २०२४-२५ पर्यंतच्या नॅशनल स्कॉलरशिप शिष्यवृत्ती अर्जांवर कार्यवाही केलेली नाही**. ही अत्यंत गंभिर बाब आहे. उक्त कालावधीतील प्रलंबित अर्जांवर कार्यवाही न झाल्याने मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे, यांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे. आपण सर्व विद्यार्थी केंद्रीत काम करीत असतांना शिष्यवृत्ती सारख्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या विषया बाबत उदासिनता योग्य नाही. **तथापी दि.०५/११/२०२४ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड अहवालानुसार सन २०२०-२१, सन २०२१-२२ सन २०२२-२३ सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मधील खालील प्रमाणे छत्रपती संभाजीनगर विभागांअतर्गत महाविद्यालय/ विद्यापीठ स्तरावरील अर्ज प्रलंबीत असल्याचे आढळून येत आहे. करिता दिनांक ३१.१०.२०२४ पर्यंत आपल्या महाविद्यालय स्तरावरील (क्लर्क व प्राचार्य लॉगीन) पात्र अर्ज मंजुरीसाठी सादर करण्यात यावेत.** तसेच ज्या विद्यार्थ्यांना वारंवार सुचना देवूनही त्रुटीची पूर्तता केली नसेल अशा विद्यार्थ्यांना शेवटची संधी म्हणून त्रुटीची पूर्तता करणेबाबत प्रत्यक्ष संपर्क करुन कळविण्यात यावे. त्यानंतरही सन २०२०-२१ ते २०२४-२५

पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी त्रुटीची पूर्तता न केल्यास त्यांचे अर्ज परत करण्यात यावेत अथवा रद्द करण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत दिनांक **१५.११.२०२४** पर्यंत पहिला हप्ता व दुसऱ्या हप्त्याचे अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित राहता कामा नये, याची कृपया नोंद घेण्यात यावी.तसेच महाविद्यालय व विद्यापीठ विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना वा दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पोस्टमॅट्रिक शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर उपलब्ध करण्यात येत आहे.

NSP पोर्टलवरील डॅशबोर्ड अहवालानुसार सन २०२४-२५ महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या

| Sr.No | Scheme Name | Application Type | Total Received | Final Verified | Defective | Rejected | Pending at Institute | Pending at Dist / State | Total Withdrawn |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Post Matric Scholaship For Students With Disabilities (Quota - 1879) | Fresh | 556 | 295 | 10 | 1 | 123 | 127 | 0 |
| | | Renewal | 379 | 233 | 9 | 0 | 51 | 86 | 22 |
| | | **Total** | 935 | 528 | 19 | 1 | 174 | 213 | 22 |
| 2 | Central Sector Scholarship Scheme (Quota - 7417) | Fresh | 3799 | 1657 | 67 | 17 | 760 | 977 | 0 |
| | | Renewal | 8816 | 5551 | 137 | 11 | 1292 | 1759 | 0 |
| | | **Total** | 12615 | 7208 | 204 | 28 | 2052 | 2736 | 0 |

| अ.क्र. | **महाविद्यालय स्तरावर प्रलंबीत अर्जांची संख्या** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | सन २०२०-२१ | सन २०२१-२२ | सन २०२२-२३ | सन २०२३-२४ | सन २०२४-२५ |
| २ | २१८ | २३७ | ५९७ | ११३४ | ७४२४ |
| | **दुसऱ्या हप्त्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रलंबीत अर्जांची संख्य** | | | | |
| | सन २०२०-२१ | सन २०२१-२२ | सन २०२२-२३ | सन २०२३-२४ | सन २०२४-२५ |
| | १२६० | ६६८ | ७७१ | १२६० | ० |

**सदरहू पडताळणी करीता प्रलंबीत राहीलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उदभवणाऱ्या प्रश्नास संबंधित विद्यापीठाबाबत कुलसचिव/ महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि १५/११/२०२४ पर्यंत या कार्यालयास सादर करावा.**

**वरील प्रमाणे सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

**( डॉ. रणजितसिंह कृ. निंबाळकर )**
**विभागीय सहसंचालक,**
**उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर**
**विभाग,छत्रपती संभाजीनगर**

**प्रत :- १. मा.संचालक,उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.**

**२. मा.प्र.कुलगुरु डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर सलग्नीत सर्व अनुदानित व विनाअनुदानित ,कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना आपले स्तरावरुन कळविण्यात यावे.ही विनंती.**

Dcgaikwad/D/Scholarship/Office letter